वाहणारे सुर सारे

अल्बम ः सागरिका म्युजिक ॲनिवर्सरी अल्बम

गायक ः स्वप्निल बांदोडकर,वैशाली सामंत

गीत ः मंदार चोळकर  संगीत ः निलेश मोहरीर

वाहणारे सुर सारे  साद देता थांबणारे
कधी वाटतात भास ही खरे
स्पंदनांशी बोलणारे
ऐकताना गुंतणारे साद देता थांबणारे
वाहणारे सुर सारे  साद देता थांबणारे

शब्द नवा सुर नवा भाव ही नवा
छंद नवा ताल नवा पण जुना दुवा
पुन्हा पुन्हा कसे नविन अर्थ लागती
जरी जुन्या सुरावटी खुणावती
जसे साकारले तरी उरे स्वप्न वेडे जागणारे
शोधताना हरवणारे साद देता थांबणारे
वाहणारे सुर सारे  साद देता थांबणारे

रंग नवा गंध नवा नाद ही नवा
स्पर्श  नवा तरी त्यात जुना गोडवा
कधी कधी मनात तार झंकारते
चाहुलीत सावली विसावते
जशी गाण्यात प्रीत माळते
श्वास हळवे गुंजणारे   गुंजणारे
पाहताना भाळणारे साद देता थांबणारे
वाहणारे सुर सारे  साद देता थांबणारे
कधी वाटतात भास ही खरे
स्पंदनांशी बोलणारे